सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
>> पान 2

फलटण येथील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी
>> पान 3

डोणगावमध्ये भटक्या कुत्र्यांचा दहशतवाद; नागरिक भयभीत
>> पान 4

**सुविचार**
नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com    मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 85 ■ मंगळवार, दि. 28 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



राजकीय आणि कलाक्षेत्राचे मिलन, समाधान सरवणकर आणि तेजस्विनी लोणारी यांचा साखरपुडा संपन्न!

आतील पान

# राजस्थान, एमपी, यूपी, बंगालसह १२ राज्यांमध्ये आजपासून एसआयआर

## ७ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होणार; पुढील वर्षी निवडणूक असलेल्या बंगालमध्ये एसआयआर, पण आसाममध्ये नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : भारत निवडणूक आयोगाकडून स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजनचा दुसरा टप्पा जाहीर केला आहे. निवडणूक आयोगानं पत्रकार परिषद घेत ही माहिती दिली आहे. दुसऱ्या टप्प्यात देशातील १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर लागू केलं जाणार आहे, अशी घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केली आहे.**





यावेळी त्यांनी बिहारच्या ७.५ कोटी मतदारांना अभिवादन करतो असं म्टलं आहे. बिहारमधील एसआयआरनंतर निवडणूक आयोगानं ३६ राज्यांच्या निवडणूक आयुक्तांसोबत दोन वेळा बैठक घेतली होती. त्यामध्ये देशभरात एसआयआर लागू करण्यापूर्वी बिहारमध्ये आलेल्या अनुभवांबाबत चर्चा करण्यात आली होती.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी दुसऱ्या टप्प्यातील एसआयआर प्रक्रिया अंदमान आणि निकोबार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्र्चिम बंगाल या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात राबवलं जाणार असल्याची माहिती दिली. यापैकी पश्र्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम,पुद्दुचेरी येथे विधानसभा निवडणूक होणार आहे. या १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात एसआयआर करण्यात येणार आहे. मतदार यादीचा अंतिम ड्राफ्ट ७ फेब्रुवारी २००६ रोजीमध्ये जारी करण्यात येणार आहे.

आजपासून दुसरा टप्पा सुरु

ज्ञानेश कुमार यांनी या राज्यांमध्ये स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन होणार असल्याची माहिती दिली. मतदार यादी आज रात्री १२ वाजता गोठवली जाणार आहे. प्रत्येक बुधवर एक बीएलओ आणि प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक ईआरओ म्हणजेच मतदार नोंदणी अधिकारी असेल. सध्या मतदारासांठी इन्यूमरेशन फॉर्म प्रिंट केला जाईल. प्रत्येक बीएलओ एकाच घरी कमीत कमी तीन वेळा भेट देईल आणि माहिती जमा करेल. जे मतदार त्यांच्या मतदारसंघाबाहेर आहेत ते हा फॉर्म ऑनलाईन भरु शकतात. या प्रक्रियेत कोणत्याही अतिरिक्त कागदपत्राची किंवा फॉर्मची आवश्यकता नसेल.

आसामसाठी स्वतंत्र आदेश

आसामध्ये दुसऱ्या टप्प्यातील एसआयआर राबवलं जाणार असल्याची माहिती दिली. भारतीय नागरिकत्व कायद्यामध्ये आसामच्या नागरिकत्वासाठी वेगळा कायदा आहे. यामुळं आसामसाठी स्वतंत्र एसआयआरचे आदेश जारी केले जातील. पश्र्चिम बंगालमध्ये एसआयआर संदर्भात कोणताही वाद नसल्याचं देखील निवडणूक आयुक्तांनी सांगितलं

## नागपुरात कुख्यात गुंडाचा मुलीवर अत्याचार, साथीदारानेही साधला डाव, राज्याला हादरवणारी घटना!

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर शहरातील नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इथे एका कुख्यात गुंडाने आपल्या साथीदाराच्या मदतीने एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपींनी पीडित मुलीचं अपहरण करून तिला एका लॉजवर घेऊन गेले. इथं दोघांनी आळीपाळीने मुलीवर लैंगिक अत्याचार केला. नराधम आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत. तर त्यांनी पीडित मुलीचे अश्लील व्हिडीओ देखील शूट केले.

तसेच घटनेची वाच्यता केल्यास संबंधित व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करू आणि जीवे मारू, अशी धमकीही आरोपींनी दिली. यानंतर आरोपींनी पीडित मुलीला सोडून दिलं. आरोपींच्या धमकीला घाबरलेल्या मुलीनं सुरुवातीला घडलेला प्रकार कुणालाच सांगितला नाही. मात्र तिच्या वागण्यातील बदल कुटुंबीयांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तिच्याकडे विचारपूस केली. यानंतर तिने तिच्यासोबत घडलेला प्रकार आपल्या आई वडिलांना सांगितला.

घटनेची माहिती मिळताच पीडितेच्या आईनं पोलीस ठाणं गाठून दोन्ही आरोपींविरोधात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. दोन्ही आरोपी फरार असून त्यांचा शोध घेतला जात आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने त्यांचा माग घेतला जात आहे. एका अल्पवयीन मुलीवर अशाप्रकारे गुंडाने आणि त्याच्या साथीदाराने अत्याचार केल्याने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.

## मेहबूब शेख यांनी बॉम्ब फोडला! आगवणे कुटुंबियांच्या आरोपानंतर रणजीत निंबाळकर वादाच्या भोवऱ्यात

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** आज बीडमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी पत्रकार परिषद घेतली आणि माजी खासदार रणजीत निंबाळकर यांनी तेथे कशा पद्धतीने आगवणे कुटुंबाचा छळ केल्याचा आरोप केला आहे. यानंतर आता आगवणे कुटुंबातील वर्षा नामक मुलीचा आत्महत्येचा प्रयत्न केल्यानंतरचा रुग्णालयातील धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे. यामध्ये मुलगी खासदार साहेबांना विनंती करताना दिसतीये.

खासदार साहेब मी आई-वडिलांचं काय चुकलं असेल तर माफी मागते, हे सगळं थांबवा अशी विनंती आणि विनवण्या करत आहे. तर सुसाईड नोटमध्ये देखील रणजीत निंबाळकरांसह अन्य काही लोकांचा उल्लेख केलेला आहे. वर्षा दिगांबर आगवणे या मुलीने आणि तिच्या बहिणीने वडील दिगांबर आगवणे तीन वर्षापासून जेलमध्ये असल्याने आणि आई देखील अनेक महिन्यांपासून घरी नसल्याने आणि मुलींना त्रास होत असल्याने आत्महत्येचा प्रयत्न केला होता.

## मराठा - कुणबी आरक्षण वाद : सुप्रीम कोर्टाचा ओबीसी संघटनेला अंशतः दिलासा

### याचिका मुख्य प्रकरणासोबत ऐकून घेण्याचे मुंबई उच्च न्यायालयाला निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानातील आमरण उपोषणानंतर मराठा-कुणबी आरक्षणासंदर्भात महायुती सरकारने काढलेल्या जीआरच्या वादात आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला लवकर सुनावणी घेण्याचे निर्देश देण्यास नकार दिला, मात्र ओबीसी वेलफेअर असोसिएशनला अंशतः दिलासा देत स्वतंत्र अर्ज दाखल करण्याची परवानगी दिली आहे. दुसरीकडे, राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसी संघटनेच्या मागणीला विरोध केला आहे.

ओबीसी वेलफेअर असोसिएशनच्या मंगेश ससाणे यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेत संघटनेने असा दावा केला होता की, राज्य सरकारने मराठा समाजासाठी काढलेल्या 'कुणबी प्रमाणपत्र' जीआरनंतर मोठ्या प्रमाणात मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्रे दिली जात आहेत. त्यामुळे ओबीसींच्या आरक्षणावर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर त्यांनी बॉम्बे उच्च न्यायालयातील सुनावणी तातडीने घेण्याची मागणी केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने या सुनावणीत स्पष्ट केलं की, उच्च न्यायालयाला विशिष्ट वेळेत सुनावणी घेण्याचे निर्देश आम्ही देऊ शकत नाही. मात्र, याचिकाकर्त्यांनी स्वतंत्र अर्ज दाखल करून तातडीच्या सुनावणीची विनंती उच्च न्यायालयाकडे करावी. म्हणजेच सर्वोच्च



न्यायालयाने ओबीसी वेलफेअर संघटनेची लवकर सुनावणीची मागणी फेटाळली, पण स्वतंत्र अर्ज दाखल करण्याची मुभा देऊन त्यांना अंशतः दिलासा दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ओबीसी वेलफेअर असोसिएशनचे वकील मंगेश ससाणे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे की आम्ही उच्च न्यायालयात लवकर सुनावणीसाठी अर्ज करू शकतो. आम्ही आता तातडीने तो अर्ज दाखल करू. सर्वात महत्त्वाचं म्हणजे आमची बाजू उच्च न्यायालयात ऐकून घेतली जाणार आहे हा आमच्यासाठी दिलासा आहे.

मराठा समाजाचे वकील काय म्हणाले?

दुसरीकडे, मराठा समाजाच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिल कैलास मोरे यांनी या सुनावणीनंतर प्रतिक्रिया देताना सांगितलं, सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी वेलफेअर असोसिएशनच्या सर्व मागण्या फेटाळल्या आहेत. त्यामुळे हा आमचा स्पष्ट विजय आहे. आता काहीही होणार नाही उच्च न्यायालयात. कारण तिथे आत्महत्यांवर नव्हे तर कायद्याच्या मुद्यांवरच सुनावणी होते.

## शेतकऱ्याने फोडली तहसीलदारांची गाडी

### सरकारच्या पॅकेजमधील अतिवृष्टीचे अनुदान न मिळाल्याने संताप अनावर; नांदेडची घटना

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मुदखेड येथे एका शेतकऱ्याने थेट तहसिलदारांची गाडी फोडल्याने चांगलाच गोंधळ निर्माण झाला होता. याप्रकरणी, ३४ वर्षीय शेतकरी साईनाथ खानसोळे याला पोलिसांनी अटक केली आहे. अतिवृष्टीग्रस्त असूनही आपल्याला शासनाच्या अनुदानाचा अद्यापही लाभ न मिळाल्याने आपण तहसिलदारांच्या गाडीची तोडफोड केल्याचं त्यांने म्हटले. विशेष म्हणजे तहसील कार्यालयातच तहसिलदारांचे वाहन उभे होते, इथेच जाऊन त्याने तहसिलदारांच्या गाडीच्या काचा फोडल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आता, याप्रकरणी, तहसिलदारांनी आपली बाजू मांडली आहे.

येथील साईनाथ खानसोळे हा शेतकरी तहसील कार्यालयात आला होता. सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजमधील अनुदानाचे पैसे अनेक शेतकऱ्यांना अद्यापही मिळाले नाहीत, शेतकऱ्यांचा कोणी वाली नाही, असे म्हणत त्याने फावड्याने तहसीलदारांची गाडी फोडली. या घटनेनं तहसील परिसरात एकच गोंधळ निर्माण झाला. तसेच, तेथील प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी पोलिसांना ताब्यात घेऊन घटनेची माहिती दिली. त्यानंतर, पोलिसांनी शेतकऱ्याला ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे. आता, याप्रकरणी, तहसिलदारांनी आपली बाजू मांडली आहे.

**त्या शेतकऱ्याला मिळाले होते अनुदानाचे पैसे - तहसिलदार**

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड येथे एका संतप्त शेतकऱ्याने तहसिलदारांची गाडी फोडल्याची खळबळजनक घटना घडली. अतिवृष्टीचे अनुदान न मिळाल्याने त्याने गाडी



फोडल्याचे प्रथमदर्शनी सांगण्यात येत आहे. गाडी फोडणाऱ्या साईनाथ खानसोडे याला पोलिसांनी ताब्यातही घेतले. दरम्यान, साईनाथ खानसोळे यांच्या खात्यात यावर्षीचे अतिवृष्टीचे ६,२०० रुपये अनुदान जमा झाले होते. मागच्या वर्षीचे अनुदान देखील त्यांना मिळाले होते, असा खुलासा तहसिलदार आनंद देऊळगावकर यांनी केला आहे. दरम्यान पोलिसांकडून साईनाथ खानसोळे याची चौकशी सूरू असुन , गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

प्राथमिक अंदाजानुसार, ऑगस्ट महिन्यातील नुकसानीमध्ये ६ लक्ष ९९ हजार ४५६ हेक्टरवरील कोरडवाहू आणि २ हजार ९७१ हेक्टरवरील बागायती पिके नष्ट झाली आहेत. तसंच ६९१ हेक्टरवरील फळबागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. सोयाबीन, कापूस (कापणीला आलेला/वेचणीसाठी आलेला), तूर यासह इतर खरीप पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. तर सुमारे ८ हजार ७४७ हेक्टर क्षेत्रावरील शेतजमीन खरडून गेली आहेत. तसेच १ हजार ३१० हेक्टर क्षेत्रावर अनावश्यक माती, दगड-धोंडे आणि कचरा वाहून आला आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांनी उत्तराधिकारी म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांची केली शिफारस!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २३ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहेत. यानंतर पुढील सरन्यायाधीश कोण? याबाबत चर्चा सुरू आहे. मात्र, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांची शिफारस केली आहे. यामुळं भारताचे पुढील सरन्यायाधीश नियुक्त करण्याची प्रक्रिया औपचारिकपणे सुरू झाली आहे. केंद्र सरकारकडून अधिसूचना निघाल्यानंतर २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सरन्यायाधीश भूषण गवई आपले पद सोडतील.

भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून पदाभार स्वीकारतील : केंद्रीय विधी आणि न्याय मंत्रालयानं अलीकडेच सरन्यायाधीश भूषण गवई यांना पत्र लिहून प्रस्थापित प्रक्रियेनुसार पुढील सरन्यायाधीशांसाठी त्यांची शिफारस मागितली होती. दरम्यान, भारताच्या सरन्यायाधीशांची नियुक्ती मेमोरँडम ऑफ प्रोसिजर (एमओपी) चे पालन करून नियुक्ती प्रक्रिया केली जाते. एमओपीमध्ये सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नियुक्ती, बदली आणि पदोन्नतीची रूपरेषा आहे. मेमोरँडम ऑफ प्रोसिजरनुसार, सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीशाची शिफारस पुढील सरन्यायाधीश म्हणून केली जाते. या परंपरेला अनुसरून, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांची सरन्यायाधीश पदासाठी शिफारस केली आहे. राष्ट्रपतींच्या औपचारिक नियुक्तीनंतर, न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून पदाभार स्वीकारतील. तसंच ९ फेब्रुवारी २०२७ पर्यत जवळपास १५ महिने त्यांचा कार्यकाळ राहील.

सर्वोच्च न्यायालयात काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव : १० फेब्रुवारी १९६२ रोजी जन्मलेले न्यायमूर्ती सूर्यकांत यांची न्यायिक आणि कायदेशीर कारकीर्द शानदार राहिली आहे. सर्वोच्च



न्यायालयात पदोन्नती होण्यापूर्वी त्यांनी हरियाणाचे महाधिवक्ता म्हणून काम पाहिलं आहे. सध्या न्यायमूर्ती सूर्यकांत अनेक महत्त्वाची संस्थात्मक पदे भूषवतात. ते रांची येथील राष्ट्रीय कायदेशीर अभ्यास आणि संशोधन विद्यापीठाचे कुलपती आणि राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणाचे पदसिद्ध कार्यकारी अध्यक्ष आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्याकडे देशाच्या सर्वोच्च न्यायालयात काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे.

### महत्त्वाच्या विषयांवर न्यायदान

कलम ३७० रद्द करणे, अभिव्यक्ती स्वातंर्त्य, लोकशाही, भ्रष्टाचार, पर्यावरण अशा महत्त्वाच्या विषयांवर न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी न्यायदान केलं आहे. तसंच निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता अधोरेखित करणाऱ्या आदेशात, त्यांनी बिहारमध्ये विशेष सखोल पुनरावलोकन (एद्दीं) नंतर यादीतून वगळलेल्या ६.५ दशलक्ष नावांची माहिती सार्वजनिक करण्यास निवडणूक आयोगाला प्रवृत्त केलं होतं. याशिवाय,सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनसह बार असोसिएशनमधील एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्याचे श्रेय देखील न्यायमूर्ती सूर्यकांत यांना जातं.

>> पान २

## विज्ञानरत्न डॉ. जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल – भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविधं प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्र्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्र्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'इंडिया मेरीटाईम वीक-२०२५'मध्ये ५५ हजार ९६९ कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार

# सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**




**मुंबई/प्रतिनिधी** : सागरी व्यापार आणि उद्योगाशी संबंधित आज करण्यात आलेल्या सामंजस्य करारांच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्र देशाच्या सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्राचे नेतृत्व करेल असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नेस्को, गोरेगाव येथे आयोजित इंडिया मेरीटाईम वीक २०२५ मध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत १५ विविध सामंजस्य करार करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप आणि सामंजस्य करार करण्यात आलेल्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अनेक कंपन्यांसोबत सागरी इकोसिस्टिम विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, सुमारे ५६ हजार कोटी रुपयांचे हे करार आहेत. यामुळे महाराष्ट्राला सागरी व्यापार आणि विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर नेण्यात मदत होईल. बंदर, वाहतूक, उद्योग आणि व्यवसाय या क्षेत्रातील सुविधा जागतिक दर्जाच्या बनतील.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस पुढे म्हणाले, मुंबईसाठी जल वाहतूक महत्त्वाची आहे. रो-रो सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आता गेटवे ऑफ इंडिया ते नवी मुंबई विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा सुरू केली जाणार आहे, ज्यामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचेल. तसेच, इलेक्ट्रिक व्हेसल (एत तर्शीशश्र) ताफा आणला जात आहे, ज्यामुळे जलवाहतूक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनेल.

राज्यात जल क्रीडा केंद्रे, जहाज बांधणी उद्योग, आणि ब्ल्यू इकॉनॉमी प्रकल्प विकसित होत आहेत. वाढवणसारखे मोठे बंदर उभारण्यात येत असून, त्यामुळे महाराष्ट्र देशाच्या सागरी क्षेत्रात नेतृत्व करेल, वाढवण बंदर राज्यातील महत्त्वाच्या शहरांशी रस्ते मार्गे जोडले जाणार आहे. त्यामुळे वाढवण बंदराचा फायदा संपूर्ण राज्याच्या विकासासाठी होणार असल्याचा विश्र्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, महाराष्ट्रासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे सागरी क्षेत्रात प्रचंड विकासाच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जहाज बांधणी धोरण, प्रवासी जलवाहतूक आणि सागरी पर्यटन या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रगण्य ठरत आहे. लवकरच महाराष्ट्र हा देशाच्या सागरी विकासाचा केंद्रबिंदू बनेल.या करारांमुळे महाराष्ट्रातील सागरी क्षेत्राला जागतिक स्तरावर नवे बळ मिळेल. बंदरविकास, जहाज बांधणी, जहाजदुरुस्ती, आणि सागरी वाहतूक क्षेत्रात गुंतवणुकीचा नवा अध्याय सुरू झाला असल्याचेही मंत्री श्री.राणे म्हणाले.

सामंजस्य करार आणि गुंतवणूक तपशील

१. अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लि. – दिघी बंदर व संलग्न पायाभूत सुविधांचा मेगा बंदर म्हणून विकास; अपेक्षित गुंतवणूक ४२,५०० कोटी.

२. जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लि. – जयगड आणि धरमतर या विद्यमान बंदरांचा विस्तार; गुंतवणूक ३,७०९ कोटी.

३. चौगुले अँड कंपनी प्रा. लि. – जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती, रिग दुरुस्ती, ऑफशोअर आणि ऊर्जा प्रकल्प विकास; गुंतवणूक ५,००० कोटी.

४. सिनर्जी शिपबिल्डर्स एन डॉक वर्क्स लि. – जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापरासाठी शिपयार्ड प्रकल्प; गुंतवणूक १,००० कोटी.

५. गोवा शिपयार्ड लि. – जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापरासाठी शिपयार्ड प्रकल्प; गुंतवणूक २,००० कोटी.

६. भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आयआयटी) मुंबई – सेंटर फॉर एक्सलन्स स्थापन करून जहाज डिझाईन व बांधणीसाठी संशोधन व विकास सुविधा निर्माण करणे.

७. आयआयटी मुंबई – सागरी अभियंत्रिकी व पायाभूत सुविधांमध्ये प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे.

८. आयआयटी मुंबई – महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या कर्मचारी वर्गासाठी क्षमता वृद्धीकरण व कौशल्यविकास उपक्रम.

९. नॉलेज मरीन अँड इंजिनिअरिंग वर्क्स लि. – जहाजबांधणी व जहाज दुरुस्ती यासाठी शिपयार्ड प्रकल्प; गुंतवणूक २५० कोटी.

१०. टीएसए एंटरप्रायझेस प्रा. लि. – वाढवण बंदरात कंटेनर फ्रेट स्टेशन (उऋड), शिपयार्ड आणि फ्लोटेल प्रकल्प; गुंतवणूक ५०० कोटी.

११. कँडेला टेक्नॉलॉजी एबी (स्वीडन) – प्रवासी जलवाहतूक जलयानांच्या बांधणीसाठी शिपयार्ड उभारणे.

१२. अबुधाबी पोर्ट्स ग्रुप (युएई) – महाराष्ट्र व संयुक्त अरब अमिराती यांच्यात सागरी क्षेत्रातील सहकार्य वाढविण्यासाठी करार.

१३. अटल टर्नकी प्रोजेक्ट्स (नेदरलँड्स) – महाराष्ट्र व नेदरलँड्स यांच्यात सागरी क्षेत्रातील सहकार्य; गुंतवणूक १,००० कोटी.

१४. इचान्डीया मरीन एबी – टग बोट्ससाठी सागरी बॅटरी ऊर्जा संचय प्रणाली असेंबली व उत्पादन सुविधा उभारणे; गुंतवणूक १० कोटी.

१५. मुंबई पोर्ट प्राधिकरण – मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी जलवाहतूक सशक्त करण्यासाठी परस्पर सहकार्याचा करार.

एकूण अपेक्षित गुंतवणूक – ५५,९६९ कोटी.

सागरी क्षेत्रात गुंतवणुकीचा नवा अध्याय

या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्रात बंदर विकास, जहाज बांधणी, सागरी संशोधन, आणि तांत्रिक प्रशिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. दिघी बंदर आणि वाढवण बंदर या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे राज्याच्या सागरी व्यापार क्षमतेत वाढ होणार आहे. आयआयटी मुंबईच्या सहकार्याने संशोधन आणि कौशल्यविकासाला चालना मिळणार आहे.

राज्यात या माध्यमातून हजारो रोजगाराच्या संधी, नव्या उद्योगांचे आकर्षण, आणि विकसित भारत २०४७ या उद्दिष्टाकडे वाटचाल गतीमान होणार आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून सागरी विकासाला नवे बळ मिळत असून, आज झालेले सामंजस्य करार हे त्या दिशेने ठोस पाऊल असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मत्स्य व्यवसाय मंत्री निलेश राणे यांनी नमूद केले.


# भाजपाचे नूतन कार्यालय अनेक पिढ्या सच्चे कार्यकर्ते घडवेल ; केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा विश्वास

## महाराष्ट्र भाजपाच्या नव्या प्रदेश कार्यालयाचे भूमिपूजन संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी कार्यालय हे मंदिरासमान असते. जनसंघाच्या स्थापनेपासूनच कार्यालयातून संघटना उभारणीचे काम, पक्षाच्या सिद्धांतांचे संवर्धन, कार्यकर्ता प्रशिक्षण, जनहितासाठी संघर्ष केला जातो. नवीन प्रदेश कार्यालय पुढच्या अनेक पिढ्या सच्चे कार्यकर्ते घडवेल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी व्यक्त केला. श्री. शाह यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टीच्या नवीन प्रदेश कार्यालयाचे भूमिपूजन सोमवारी संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पणन मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खा. नारायण राणे, ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण अतुल सावे, वनमंत्री गणेश नाईक, कामगार मंत्री आकाश फुंडकर, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, सरचिटणीस माधवी नाईक, राजेश पांडे, खा. उज्ज्वल निकम, मनोज कोटक आदी उपस्थित होते.



श्री. शाह म्हणाले की, अन्य सर्व पक्षांसाठी पक्षकार्यालय ही केवळ वास्तू असते. मात्र भाजपा कार्यकर्त्यांसाठी कार्यालय हे मंदिराप्रमाणे असते. भाजपा हा एकमेव पक्ष आहे जिथे बूथ अध्यक्ष पार्टीचा अध्यक्ष बनतो. पंतप्रधान, मुख्यमंत्री हे देखील कार्यकर्त्यांमधूनच बनतात. भाजपामध्ये घराणेशाहीला थारा नाही असे म्हणत श्री. शाह यांनी काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांवर टीका केली. लोकशाही मूल्यांवर आधारित भाजपाचा कारभार आहे. सेवा,त्याग, समर्पण आणि देशभक्तीच्या बळावर जो कार्य करतो तो सामान्य कार्यकर्ताही उंचीवर जाऊ शकतो. नरेंद्र मोदी हे त्याचे उत्कृष्ट उहादरण आहे असेही त्यांनी नमूद केले. जो पक्ष लोकशाही मूल्यांवर चालतो तोच पक्ष लोकशाहीचे खऱ्या अर्थाने रक्षण करू शकतो असा टोला घराणेशाहीवर चालणा-या पक्षांना लगावला. सर्व शासकीय जिल्ह्यांतील भाजपा मुख्यालयांची कामे ही डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होतील. जवळपास ६६० संघटनात्मक जिल्ह्यांपैकी ३७५ जिल्ह्यांत कार्यालये आहेत आणि ९० ठिकाणी काम सुरू आहे असेही त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आज सर्वच आघाड्यांवर अव्वल बनत आहे. गरीब कल्याण, मोफत धान्यवाटप, मोफत वैद्यकीय सुविधांमुळे गरीबांचे जीवन सुकर केले आहे. अर्थव्यवस्था ११व्या स्थानावरून ४थ्या क्रमांकाची बनली आहे. देश बलशाली, आत्म निर्भर आणि सुरक्षीत बनला आहे. दहशतवादी हल्ले करणा-यांना जबर धडा शिकवला जात असल्याचेही श्री. शाह यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्यांनी प्रत्येक शासकीय जिल्ह्यांत भाजपाचे कार्यालय असावे हा निर्धार केला होता त्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते प्रदेश कार्यालयाचे भूमि पूजन होणे हा सर्वांसाठी आनंदाचा क्षण आहे. दोन ते अडीच वर्षांत हे कार्यालय बांधून पूर्ण होईल. जनसामान्यांना न्याय तसेच कार्यालयात कार्यकर्त्यांना प्रशीक्षण मिळायला हवे या हेतूने देशभरात भाजपाच्या कार्यालय निर्माणाचे काम वेगाने सुरू आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, पक्ष उभारणी, जनसामान्यांची कामे आणि कार्यकर्ते घडवण्यासाठी प्रत्येक शासकीय जिल्ह्यात पक्ष कार्यालय असावे याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आग्रही होते. त्यांनी सातत्याने याबाबत मार्गदर्शन केले होते. पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यापासून देवेंद्र फडणवीस यांनीही प्रदेश भाजपाच्या नवीन कार्यालय उभारणीसाठी अनेक प्रयत्न करून पाठपुरावा केला. या दोघांच्या प्रयत्नांमुळे ही नवीन वास्तू लवकरच तयार होणार आहे.

तत्पूर्वी सोमवारी सकाळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सपत्नीक पूजा केली.

जागा बळकावण्याची सवय जडलेल्यांनी आम्हाला प्रश्न विचारू नयेत – मुख्यमंत्री फडणवीस

भाजपाचे कार्यालय हे पक्षाचे आणि कार्यकर्त्यांचे घर असते. प्रदेश भाजपाच्या या नवीन कार्यालयाची जागा स्वखर्चाने विकत घेऊन, महापालिकेचे सर्व नियम पाळून, नियम ात कुठलीही सूट न घेता खरेदी करण्यात आली आहे. सर्व परवानग्या, सर्व प्रक्रिया पूर्ण करूनच हे कार्यालय बांधण्यात येत आहे. भाजपा काचेच्या घरात रहात नाही. तेव्हा दगड फेकू नका. जागा बळकावण्याची सवय जडलेल्यांनी आम्हाला प्रश्न विचारू नयेत, असे म्हणत श्री. फडणवीस यांनी विरोधकांना लक्ष्य केले. भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या स्वप्नातील कार्यालय सामुहिक प्रयत्नांतून साकारेल त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने समर्पण निधी द्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

## राजकीय आणि कलाक्षेत्राचे मिलन, समाधान सरवणकर आणि तेजस्विनी लोणारी यांचा साखरपुडा संपन्न!

**मुंबई/प्रतिनिधी** : शिवसेना पक्षाचे युवा नेते समाधान सरवणकर आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आणि निर्माती तेजस्विनी लोणारी यांच्या आयुष्यातील एक अत्यंत खास आणि आनंदाचा क्षण नुकताच साकारला. या दोघांचा साखरपुडा कुटुंबीयांच्या उपस्थितीत अतिशय पारंपरिक आणि आनंदमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याला दोन्ही कुटुंबीयांसह अगदी जवळचे नातेवाईक आणि काही निवडक मित्र मंडळी उपस्थित होती. मराठी चित्रपटसृष्टीतील पूजा सावंत, सिद्धार्थ जाधव, अभिजित आणि सुखदा खांडकेकर जातीने हजार होते.

समाधान सरवणकर हे शिवसेना पक्षातील तरुण आणि ऊर्जावान नेते म्हणून ओळखले जातात. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग, लोकांशी असलेला आत्मीय संबंध आणि प्रामाणिक कार्यपद्धती यामुळं त्यांनी राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दुसरीकडे, तेजस्विनी लोणारी ही मराठी मनोरंजनविश्वातील एक बहुगुणी कलाकार आहे. अभिनेत्री, निर्माती आणि सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेणारी तेजस्विनी आपल्या सौंदर्य, अभिनयकौशल्य आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वामुळे प्रेक्षकांची लाडकी बनली आहे.

तेजस्विनीनं आपल्या अभिनय प्रवासाची सुरुवात नो प्रॉब्लेम या चित्रपटातून केली. चित्रपटातील यशानंतर तेजस्विनीने दूरदर्शनकडे वळत ऐतिहासिक आणि भव्य अशा चित्तोड की रानी पद्मिनी का जोहर या मालिकेत मुख्य भूमिका साकारली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# फलटण येथील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ





**सातारा/प्रतिनिधी** : फलटण (जि. सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केल्याची घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. त्यांच्या मृत्यूपूर्वी स्वतःच्या तळहातावर लिहिलेल्या मजकुरातून पोलीस निरीक्षक गोपाल बदने यांच्याकडून बलात्कार तसेच प्रशांत बनकर व इतरांकडून मानसिक व शारीरिक छळ झाल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या आत्महत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी बुलढाणा जिल्हा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने मा.जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात डॉ. मुंडे यांनी तत्कालीन पोलीस अधिक्षक श्री. अनिल महाडीक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राहुल धस यांच्याकडे वारंवार तक्रार केली असूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले, ही बाब अत्यंत गंभीर आहे. पोलीस यंत्रणेतील अधिकाऱ्यांवरच असे आरोप होणे हे कायदा सुव्यवस्थेच्या आणि राज्य प्रशासनाच्या प्रतिमेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. याशिवाय, आरोपींना संरक्षण देण्यासाठी सत्ताधारी पक्षाशी संबंधित माजी खासदार रणजीत नाईक-निंबालकर तसेच त्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र शिंदे आणि रोहित नागतिळे स्थानिक प्रशासनावर अनुचित प्रभाव टाकत असल्याचेही समोर आले आहे. अशा प्रकारचा राजकीय हस्तक्षेप हा संविधान आणि कायद्याच्या शासनाच्या तत्त्वांना विरोधी आहे.

डॉ. मुंडे यांनी आपल्या सेवाकालात वैद्यकीय प्रामाणिकतेने काम करताना काही प्रकरणांमध्ये पोलीस दबाव नाकारला होता, त्यामुळेच त्यांच्या छळाची तीव्रता वाढली. त्यांनी या संदर्भात लेखी तक्रारी केल्या होत्या व माहिती अधिकाराखाली अर्जही दाखल केला होता. मात्र योग्य वेळी कारवाई न झाल्याने अखेरीस त्यांनी आत्महत्या करून जीवन संपविले. या प्रकरणात पोलिसांकडून निष्क्रियता, शवविच्छेदनात झालेला विलंब आणि प्राथमिक तपासातील त्रुटी या बाबी चौकशीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. तसेच, मृत व्यक्तीचे चरित्रहनन करण्याचा प्रयत्न काही समाजमाध्यमांतून सुरू आहे, ही बाबही अत्यंत निंदनीय आहे.

या सर्व घटनांवरून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी होणे अत्यावश्यक आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासकीय सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशी मागणी बुलढाणा जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई बढे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख विजया खडसान, उपजिल्हाप्रमुख प्रतिक्षा पिंपळे, रत्ना शेळके, अनिता गायकवाड, सुनिता गाकवाड, स्मिता वराडे, शितल सुरडकर, सपना इंगळे, वंदना मेढे, श्रध्दा आराख, कविता भागीले, संगीता सोनुने, सुवर्णा जाधव, बेबी परिहार, सुनिता सुरडकर, शारदा दाभाडे, सरला चौथनकर, सविता राऊत, आरती जाधव, सुनिता दराखे, सोनाली वाघ, मिना इंगळे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

## संक्षिप्त...

### मुसळधार पावसामुळे निफाड लासलगाव-भरवस फाटा रस्त्यावरील पूलगेलं पाण्याखाली; काही गावांचा तुटला संपर्क



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : निफाड भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे लासलगाव-भरवस फाटा रस्त्यावरील पूल पाण्याखाली गेला असून पुलावरून मोठ्या प्रमाणात पूर पाणी वाहत असल्यामुळे काही गावांचा संपर्क तुटला असे असले तरी वाहन धारकांसोबत नागरिक जीव धोक्यात घालून पुराच्या पाण्यातून ये-जा करीत आहे. पाण्यातून जाताना दोन दुचाकी धारक थोडक्यात बचावले. पुलाची उंची कमी असल्यामुळे दर वर्षी पावसाळ्यात पूल पाण्याखाली जातो, त्यामुळे अनेक गावच्या नागरिकांना त्याचा फटका बसतो त्यामुळे पुलाची उंची वाढविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### जालन्यात भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी नागरिकांचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : जालन्यात भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी रास्ता रोको करत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढलाय. मागच्या काही दिवसांत शहरात भटक्या कुत्र्यांनी अक्षर: हैदोस घातला असून, अनेक चिमुकल्यांची लटके तोडलेत. तर काही चिमुकल्यांनी प्राणही गमावले आहेत. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा यासाठी नागरिकांनी अंबड चौफुली येथे रास्ता रोको आंदोलन केले, तर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. दरम्यान, भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास प्रशासनाच्या दालनात कुत्रे सोडण्याचा नागरिकांनी इशारा दिलाय.

### वॉटर मेट्रो; जलमार्गाचा शाश्वत प्रवास; इंडिया मेरीटाईम वीक-२०२५ परिसंवादात मान्यवरांचे मत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : वॉटर मेट्रो हा प्रकल्प मुंबईच्या वाहतुकीच्या इतिहासात शाश्वत आणि हरित प्रवास ठरेल. जलवाहतुकीच्या माध्यमातून शहरात पर्यावरणपूरक विकासाचा मार्ग खुला होईल, असे मत मान्यवर तज्ज्ञांनी व्यक्त केले.

गोरेगाव येथे आयोजित 'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' या कार्यक्रमात आमची मुंबई वॉटर मेट्रो स्वप्न नव्हे, सत्य या विषयावर झालेल्या परिसंवादात सहभागी मान्यवरतज्ज्ञांनी या प्रकल्पाबद्दल विचार मांडले.

या परिसंवादात लोकनाथ बेहरे, व्यवस्थापकीय संचालक, के.एम.आर.एल.,आशिम मॉगीया, एम.डी., एम २ एम फेरी, नकुल विराट, मुख्य व्यावसायिक अधिकारी, कँडेला, अंबर आयदे, मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक, रुरल एनहान्सर ग्रुप आणि सिध्दांत थंडशेरी, सीईओ, नवलट यांनी सहभाग घेतला होता.

''वॉटर मेट्रो'' प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईतील वाहतुकीस एक नैसर्गिक, प्रदूषणमुक्त आणि विना-अडथळा पर्याय उपलब्ध होईल, असे तज्ज्ञांनी सांगितले. या प्रकल्पामुळे मुंबईतील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवाशांना सुखकर, वेळ बचतीचा आणि पर्यावरणपूरक प्रवास करता येईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

शासन आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दिशा, तांत्रिक बाबी आणि भविष्यातील संधींबाबत सखोल चर्चा केली.

यावेळी महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य बंदर अधिकारी यांच्या उपस्थितीत एमएमआरडीए क्षेत्रातील ''वॉटर मेट्रो'' प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले.

जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर धोरणामुळे सागरी उद्योगासाठी नव्या संधी निर्माण होणार

राज्य शासनाने जाहीर केलेल्या जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर धोरणामुळे महाराष्ट्रातील सागरी उद्योगाला नवी दिशा मिळणार आहे. या धोरणामुळे राज्यात गुंतवणुकीच्या संधी वाढणार असून, रोजगारनिर्मितीला देखील चालना मिळेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.


## पुणे जैन बोर्डिंग जागेच्या बेकायदेशीर विक्रीविरोधात राज्यभरात संतापाचा उद्रेक, अहिल्यानगरमध्ये मोर्चा

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : पुणे शहरातील मॉडेल कॉलनी येथील ऐतिहासिक 'सेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंग'च्या जैन मंदिरासह परिसरातील मौल्यवान जागा काही विश्वस्तांनी बेकायदेशीरपणे विकल्याच्या संतापजनक प्रकरणामुळं महाराष्ट्रातील जैन समाजामध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. धर्मशाळेच्या जागेवर ७० कोटी रुपयांचा व्यवहार करत जैन मंदिरच गहाण ठेवल्याचा धक्कादायक आरोप असल्याने, जैन समाजाच्या भावना मोठ्या प्रमाणात दुखावल्या गेल्या आहेत. यामुळं केवळ जैन समाजच नव्हे, तर सर्वसामान्य पुणेकर आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्येही तीव्र रोष पाहायला मिळत आहे.

हा व्यवहार उघडकीस आल्यानंतर राज्यभरात याविरोधात जनआंदोलन उभे राहिले. जनमताचा आणि कायदेशीर दबावाचा परिणाम म्हणून, जागा खरेदीदार बिल्डर गोखले यांनी ईमेलद्वारे हा वादग्रस्त विक्री व्यवहार तत्काळ रद्द करत असल्याचं जाहीर केलं.

हा जैन समाजाच्या संघर्षाचा मोठा विजय मानला जात आहे. दरम्यान आज राज्यभरात जैन मंदिराचे आणि होस्टेलच्या जागेचे पावित्र्य जपण्याच्या आणि संरक्षणाच्या मागणीसाठी सकल जैन समाजाकडून भव्य मूक मोर्चा काढण्यात आला. अहिल्यानगरमध्ये सकल जैन समाजाने आज शहरातील कापड बाजार येथून मोर्चाला सुरुवात केली. या मोर्चात जैन समाजातील महिलांची आणि युवा वर्गाची उपस्थिती प्रचंड लक्षणीय होती.

## 'दक्षता जनजागृती सप्ताहा'निमित्त महाराष्ट्र सदन येथे भ्रष्टाचार निर्मूलन प्रतिज्ञा



नवी दिल्ली : दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जुने महाराष्ट्र सदन येथे भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच राज्यपाल आचार्य देवव्रत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदेशांचे उपस्थितांसमोर वाचन करण्यात आले.

याप्रसंगी निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला, निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या प्र.उपसंचालक मनिषा पिंगळे यांच्यासह महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. देशाच्या आर्थिक, सामाजिक तथा राजकीय प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा एक मोठा अडथळा असून सर्व कामे प्रामाणिकपणे करण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी घेतली.

राज्यपाल, मुख्यमंत्री यांचे संदेश

दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त पाठविलेल्या संदेशात राज्यपालांनी नागरिकांचा सक्रिय सहभाग, प्रामाणिक आचरण आणि पारदर्शक प्रशासन याबरोबरच सामूहिक प्रयत्नांद्वारे आपण 'विकसित भारत २०४७'कडे वाटचाल करतो आहे असे सांगितले.

आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या भ्रष्टाचारमुक्त भारत संकल्पनेला वास्तवात आणण्यासाठी ही जनजागृती मोहीम अत्यंत महत्वपूर्ण आहे. दक्षता जनजागृती सप्ताहाच्या माध्यमातून आपण सर्वांनी भ्रष्टाचाराविरोधी भूमिका घेत, प्रामाणिकता आणि पारदर्शक कारभारातून विकसित भारताच्या निर्मितीत आपले योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संदेशाद्वारे केले.

राज्यात दरवर्षी 'दक्षता जनजागृती सप्ताह' आयोजित करण्यात येतो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी 'दक्षता: आपली सामायिक जबाबदारी' ही संकल्पना घेऊन हा सप्ताह साजरा केला जाणार आहे.

## कोकणात प्रदूषणमुक्त प्रवासासाठी 'शिवाई ई-बसेस'चा शुभारंभ



**रत्नागिरी/प्रतिनिधी** : कोकणातील स्वच्छ आणि हरित प्रवासाला चालना देण्यासाठी सरकारकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आलं आहे. राज्यातील जुन्या व जीर्ण बसेस बदलून आधुनिक आणि पर्यावरणपूरक 'शिवाई ई-बसेस' प्रवाशांच्या सेवेत दाखल होत आहेत.या उपक्रमांतर्गत दापोली मतदारसंघासाठी आज १० ई-बसेस कार्यरत करण्यात आल्या असून, लवकरच दापोलीसाठी आणखी २५ आणि खेड तालुक्यासाठी ३५ ई-बसेस मिळणार आहेत. विजेवर चालणाऱ्या या ई-बसेसमध्ये वातानुकूलित सुविधा, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, आपत्कालीन सूचना यंत्रणा आणि दिव्यांग प्रवाशांसाठी रॅम्पची सोय उपलब्ध आहे. म्हणूनच या बसेस कोकणातील प्रवास अधिक सुरक्षित, आधुनिक आणि प्रदूषणमुक्त बनवतील.

## सुट्ट्यांसह साईदर्शनाकरिता गाठला दिवाळीचा 'मुहूर्त'; दहा दिवसात सहा लाख भाविकांनी घेतले दर्शन

**शिर्डी/प्रतिनिधी** : दिवाळीच्या दहा दिवसांच्या सुट्ट्या आणि त्याला जोडून आलेल्या शनिवार-रविवारच्या मुहूर्तावर शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली. या कालावधीत तब्बल सहा ते सात लाख भाविकांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

# चोपडा-यावलचा विसर? शेतकऱ्यांचा संताप; धानोरा येथे रास्ता रोको आंदोलन

दैनिक आपला विदर्भ





**जळगाव/प्रतिनिधी** :जळगाव जिल्ह्यातील मंत्र्यांनी फक्त आपल्या मतदारसंघापुरतेच पालकत्व निभावल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत असून, चोपडा आणि यावल तालुक्यांकडे दुर्लक्ष झाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. ''यावल आणि चोपड्यातील नागरिक तुमचे मतदार नाहीत का?'' असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित करण्यात आला आहे.

राज्यातील अतिवृष्टी आणि पुरसदृश्य परिस्थितीमुळे शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. राज्य सरकारने नुकसानग्रस्त भागांसाठी मदत जाहीर केली असली, तरी जळगाव जिल्ह्यातील तीन राज्यमंत्री आणि एका केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या मतदारसंघांना प्राधान्य देण्यात आले, तर चोपडा आणि यावल तालुक्यांची नावे या यादीतून वगळण्यात आली.

सुरुवातीला या दोन्ही तालुक्यांचा समावेश यादीत होता; मात्र नंतर त्यांची नावे काढण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. चोपड्यातील अनेक मंडळांमध्ये ढगफुटीसदृश पावसामुळे केळी, कापूस, मका आणि सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तरीदेखील जिल्ह्यातील मंत्र्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी अकुलखेडा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर आज धानोरा येथेही शेकडो शेतकरी रस्त्यावर उतरले. आंदोलनकर्त्यांनी केळीचे घड हातात घेऊन सरकार आणि मंत्र्यांविरोधात घोषणाबाजी केली.

शेतकरी कृती समितीचे एस. बी. पाटील यांनी इशारा दिला की, ''आठ दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास येणाऱ्या काळात सरकार आणि जिल्ह्यातील मंत्र्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.''

# डोणगावमध्ये भटक्या कुत्र्यांचा दहशतवाद; नागरिक भयभीत

## बंदोबस्त आणि लसीकरण मोहिमेची तातडीची गरज

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुमारे २० ते २५ कुत्र्यांची टोळी सकाळ-संध्याकाळ सार्वजनिक ठिकाणी, सोसायट्यांमध्ये आणि मुख्य रस्त्यांवर मुक्तपणे फिरताना दिसत आहे. या कुत्र्यांच्या आक्रमक वर्तणुकीमुळे महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक भयभीत झाले आहेत.

राज्य महामार्गालगत शाळा व महाविद्यालय परिसरात या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यात कुत्र्यांच्या झुंडीमुळे अडथळा निर्माण होत असून, काही वेळा भीतीने मुले परत फिरत असल्याचे पालकांनी सांगितले. ''कुत्र्यांचा कळप दिसला




की रस्त्यावरून जाणेही कठीण होते,'' असे स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे. गेल्या काही दिवसांत कुत्रे चावल्याच्या घटना घडल्याची माहिती मिळाली आहे. तरीदेखील ग्रामपंचायतीकडून किंवा संबंधित प्रशासनाकडून अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.

- डोणगाव परिसरात २०२५ भटक्या कुत्र्यांचा मुक्त वावर
- शाळा-महाविद्यालय परिसरात वाढलेली उपस्थिती
- कुत्रे चावल्याच्या घटनांत वाढ
- ग्रामपंचायतीकडून ठोस कारवाईचा अभाव
- नागरिकांकडून बंदोबस्ताची तातडीची मागणी

### नियम काय सांगतो?

'प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६०' आणि 'प्राणी जन्म नियंत्रण नियम, २००१' नुसार भटक्या कुत्र्यांचे लसीकरण, नसबंदी आणि निर्बंध ही जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे.ग्रामपंचायत, नगरपरिषद किंवा महानगरपालिका प्रशासनाने या मोहिमा राबवायच्या असतात.

या प्रक्रियेत पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग आणि प्राणी कल्याण संस्था यांचा समन्वय आवश्यक असतो. त्यामुळे ग्रामपंचायतीने संबंधित विभागांच्या मदतीने कुत्र्यांचे लसीकरण, पकड मोहीम व निर्बंध उपाय तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

''भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करून लसीकरण मोहीम राबवावी, अन्यथा मोठी दुर्घटना घडू शकते,'' अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## विविध वृत्त...

### खड्डे बुजवण्यासाठी व्यापाऱ्यांचं भिक मांगो आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया नगर परिषद अंतर्गत मोठ्या प्रमाणात बाजारपेठेतील मार्गावर खड्डे पडले आहेत या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे अपघात होत असतात आणि याचा नाहक त्रास व्यापाऱ्यांना होत असतो. त्यामुळे गोंदिया जिल्हा व्यापारी संघा द्वारा आज नगर परिषदेला वारंवार निवेदन देऊनही खड्डे बुजवण्यात आल्या नाही त्यामुळे रोष व्यक्त करीत व्यापाऱ्यांनी नगरपरिषद क्षेत्रामध्ये मुख्य बाजारपेठेमध्ये भिक मांगो आंदोलन केले आणि यामधून जमा होणाऱ्या पैशातून खड्डे बुजविण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे खड्ड्यांच्या बाबतीत नगरपरिषद प्रशासन किती गंभीर आहे हे लक्षात येते आता तरी नगरपरिषद प्रशासन जागे होऊन हे खड्डे बुजवण्यासाठी प्रयत्न करतील अशी मागणी आता नागरिक करतात.

### दुर्गोत्सव २०२५ उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अमृत संस्था यांच्या माध्यमातून यंदाच्या दिवाळीच्या कालावधीत 'दुर्गोत्सव २०२५' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या दुर्गोत्सवामध्ये नुकतेच १२ किल्ल्यांना वर्ल्ड हेरिटेजचे नामांकन प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळीमध्ये घराघरात किल्ले बनविण्याच्या परंपरेला एक नवे रूप देत, नागरिकांनी या १२ किल्ल्यांपैकी कोणत्याही एका किल्ल्याची प्रतिकृती बनवून तयार झालेल्या किल्ल्याचा स्वत:सह फोटो http://www.durgotsav.com या संकेतस्थळावर १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अपलोड करावा, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमाणी यांनी केले आहे.




रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेर दुर्ग, खांदेरीचा दुर्ग, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग आणि जिंजी असे १२ किल्ल्यांना वर्ल्ड हेरिटेजचे नामांकन प्राप्त झाले आहे. राज्य शासनाच्या वतीने अमृत (महाराष्ट्र संसोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) संस्थेद्वारे महाराष्ट्राचे ऐतिहासिक वैभव असलेल्या गड-किल्ल्यांचे महत्त्व जगाच्या नकाशावर ठसविण्यासाठी आणि पुढील पिढ्यांपर्यंत त्याचा वारसा पोहोचवण्यासाठी एक आगळा-वेगळा व प्रेरणादायी उपक्रम दुर्गोत्सव आयोजित केला आहे. विशेषतः दिवाळी सणाच्या निमित्ताने हा उपक्रम विश्वविक्रम करण्याचा संकल्प घेऊन साकारला जात आहे.

## रब्बी हंगामासाठी कृषी विभागाचे नियोजन: शेतकऱ्यांनी तयारीला लागावे

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** रब्बी हंगाम सन २०२५-२६ साठी कृषि विभाग सज्ज झाले असून लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी हवामान, पाण्याची उपलब्धता आणि जमिनीचा पोत लक्षात घेऊन योग्य पीक नियोजनावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी तंत्र अधिकारी(विस्तार) अजय वाढे यांनी केले आहे.

जिल्हा कृषी विभागाने रब्बी हंगामासाठी ३ लाख ८७ हजार ३५९ हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे, जे सरासरी ३ लाख २९ हजार ८०३ हेक्टर क्षेत्रापेक्षा अधिक आहे. हंगामात हरभरा २ लाख ६० हजार १०० हेक्टर, गहू ७८ हजार हेक्टर, मका ३२ हजार हेक्टर आणि ज्वारी १६ हजार हेक्टर ही प्रमुख पिके राहणार असून, शेतकऱ्यांनी वेळेवर पेरणी करून नियोजित उद्दिष्ट साध्य करण्यास सहकार्य करावे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी प्रमुख पिकांचे प्रमाणित बियाणे अनुदानित दरात उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. यामध्ये हरभरा बियाणे (१० वर्षांच्या आतील वाण) : २०७३.४०क्विंटल बियाणे वितरणाचे नियोजन असून, ५० रुपये प्रति किलो अनुदान. हरभरा बियाणे (१० वर्षांवरील वाण) : २०७० क्विंटल बियाणे वितरणाचे नियोजन असून २५ रुपये प्रति किलो अनुदान. ज्वारी बियाणे (१० वर्षांच्या आतील वाण) : ४० क्विंटल बियाणे वितरण, ३० रुपये प्रति किलो अनुदान. ज्वारी बियाणे (१० वर्षांवरील वाण) : १७० क्विंटल बियाणे वितरण, १५ रुपये प्रति किलो अनुदान. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी जमिनीची मशागत योग्य पद्धतीने करावी, तपासणी केलेले व उपचारित बियाणे वापरावे आणि पीकसंरक्षण व खत व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करावे. रब्बी हंगाम यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाने आखलेल्या नियोजनास सहकार्य करून अधिक उत्पादन घेऊन आर्थिक उन्नती साधावी, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

## काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर आणि आमदार रवी राणा यांच्यात शब्दबाण

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** दिवाळी निमित्त किराणा किट आमदार रवी राणा यांनी काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांच्या घरी पाठवल्यानंतर यशोमती ठाकूर यांनी संतापून रवी राणा यांच्यावर गंभीर आरोप करत टीका केली होती, त्यानंतर रवी राणा यांनी यशोमती ठाकूर यांच्यावर पलटवार करत प्रतिक्रिया दिली, तर यावर यशोमती ठाकूर यांनी पुन्हा पलटवार करत रवी राणा यांच्यावर टीका करत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी रवी राणा यांच्या प्रॉपर्टी आणि व्यवहारावर ईडी चौकशी लावली पाहिजे,



तुमचा कामधंदा काय आहे. साऱ्या जगाला माहिती आहे तुम्ही जर गरीब होते तर तुमच्याकडे इतक्या मोठ्या प्रॉपर्टी आल्या कुठून असा सवाल यशोमती ठाकूर यांनी उपस्थित केला, तर ज्यावेळी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाऊस पडत होता त्यावेळी तुम्ही नाच गाण्यांमध्ये व्यस्त होता, तुमचं वागणं अत्यंत विचित्रपणाचं आहे तुम्ही शेतकऱ्यांची वारंवार थट्टा करता त्यामुळे रवी राणा यांनी शेतकऱ्यांची थट्टा करणे बंद करावी, मी शेतकऱ्यांची मुलगी आहे अशी प्रतिक्रिया काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी दिली

## बुलढाणा मनसेतर्फे वैभव भुतेकरांचा सत्कार

### ''वैभवच्या यशाने जिल्ह्याची मान उंचावली'' : अमोल रिंढे पाटील




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पाडळी गावचा सुपुत्र वैभव बबनराव भुतेकर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण (वर्ग-१) या पदावर निवड झाली आहे. राज्यातून दुसरा क्रमांक पटकावून वैभवने जिल्ह्याचा लौकिक वाढवला असून त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल बुलढाणा मनसेच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.

सोमवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी बुलढाणा मनसेचे तालुकाध्यक्ष अमोल रिंढे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात हा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी बोलताना अमोल रिंढे पाटील म्हणाले, ''वैभव भुतेकर याने शिक्षक, लिपिक अशा पदांवर कार्यरत राहूनही आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवले. त्याच्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीमुळे हे यश शक्य झाले. त्याच्या या यशाने जिल्ह्याची मान उंचावली आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या सर्व तरुणांसाठी तो प्रेरणास्थान ठरेल.''

या प्रसंगी बाळाभाऊ पाटील, पंढरी पवार, आकाश पवार, मनसे युवा नेते प्रतीक पवार, ऋषिकेश पाटील, स्वप्निल रिंढे, कृष्णा रिंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

समारंभानंतर उपस्थितांनी वैभव भुतेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कारखान्यांना निवेदन; उसाला प्रति टन ₹३७५१ दराची मागणी

**सांगली/प्रतिनिधी :** राज्यात उसाच्या चालू गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऊस दराचे आंदोलन पेटण्याची चिन्हं दिसत आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने प्रति टन ऊसाला विना कपात ₹३७५१ दर आणि मागील हंगामातील ₹२०० हप्ता देण्याची मागणी केली आहे. या मागणीसंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दत्त इंडिया व वसंतदादा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद मोरे आणि व्हॉइस प्रेसिडेंट मृत्युंजय शिंदे यांना निवेदन दिलं आहे. ही मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी जयसिंगपूर येथील २४व्या ऊस परिषदेत मांडलेल्या भूमिकेचा पाठपुरावा म्हणून करण्यात आली आहे.

## वर्ध्यात एआयएमआयएमचे 'कफन-दफन' आंदोलन

### शहरातील खड्डे आणि डांबरीकरणाच्या मागणीसाठी आसिफ खान यांचे आमरण उपोषण सुरू

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** शहरातील रस्त्यांवरील खड्डे, उडानपुलाच्या डांबरीकरणाचा अभाव आणि नागरिकांना मूलभूत सुविधा न पुरवल्याच्या निषेधार्थ एआयएमआयएम पक्षाच्या वतीने वर्ध्यात 'कफन-दफन' प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर पार पडले. जिल्हा प्रभारी आसिफ खान यांनी स्वतः खड्ड्यात झोपून आंदोलनाची सुरुवात केली आणि कफन दफन आंदोलनासोबतच आमरण उपोषणही सुरू केले आहे.




**सार्वजनिक बांधकाम विभागासमोर खड्ड्यात झोपून 'कफन-दफन' आंदोलन करताना एआयएमआयएमचे जिल्हा प्रभारी आसिफ खान.**

**आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत**

आचार्य विनोबा भावे उडानपुलाचे तात्काळ डांबरीकरण

शहरातील सर्व खड्डे बुजविणे

नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे

शहरातील नागरिकांसाठी योग्य पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची ही मागणी पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा आसिफ खान यांनी दिला आहे.

''जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन थांबवणार नाही.''

**- आसिफ खान, जिल्हा प्रभारी, एआयएमआयएम**